'दे मार' भगिनीपुराण

फर्स्ट डे फर्स्ट शो

चित्रपटाचे नाव : पटाखा
निर्माते : विशाल भारद्वाज, रेखा भारद्वाज, धीरज वाधवान,
लेखन व दिग्दर्शन : विशाल भारद्वाज
संकलन : रणजित पलित
गीते : गुलजार
संगीत, पार्श्वसंगीत : विशाल भारद्वाज
कलाकार : सान्या मल्होत्रा, राधिका मदान, विजय राज, सुनील ग्रोव्हर
दर्जा : ★★★½☆



जयदीप पाठकजी
Jaydeep.Pathakji@timesgroup.com

मानवी स्वभावाची काळी बाजू रंजकतेने पडद्यावर रंगवणारा विशाल भारद्वाज हा एक अवलिया दिग्दर्शक आहे. त्याच्या सिनेमांचे आशय, त्यातील व्यक्तिरेखा या चित्रपटाची कथा घडत असलेल्या मातीतील असतात, त्यांचं मूळ अस्सल असतं आणि त्याच अनुषंगाने त्यांचं वर्तनही एकदम 'रॉ' असतं. आखीव, रेखीव सिनेमांच्या फंदात हा माणूस कधीच पडत नाही. 'पटाखा'ही त्याच मार्गावरून जातो. चित्रपटांसाठी कादंबरी किंवा नाटकाचा गाभा निवडणाऱ्या भारद्वाजने यंदा चरणसिंह पथिक यांच्या एका लघुकथेचा उपयोग केला आहे. दोन बहिणींच्या या गोष्टीचा जीव अतिशय छोटा आहे. मात्र, पटकथाकाराने त्यावर पूर्ण लांबीच्या चित्रपटाचा डोलारा उभा केला आहे. सिनेमा एकदा पाहण्यासारखा आहे. मात्र, साचेबद्ध सिनेमाप्रमाणे तो नाही. मध्यंतरानंतर काहीसा 'ट्रॅक' सुटलेला सिनेमा शेवटाकडे सावरतो. तो चार घटका टाइमपास निश्चित करतो; पण अर्थातच त्याचा 'पॅटर्न' वेगळा आहे. विशाल भारद्वाजचे 'प्रयोग' स्वरूपाचे सिनेमे पाहणाऱ्यांसाठी मात्र तो खास आहे.

चित्रपटाची गोष्ट राजस्थानात घडते. चंपा उर्फ बडकी (राधिका मदान) आणि गेंदा उर्फ छुटकी (सान्या मल्होत्रा) या दोन सख्ख्या बहिणींची ही गोष्ट आहे. सतत एकमेकींना पाण्यात पाहणे आणि काही ना काही कारण काढून एकमेकांविरोधात 'युद्ध' पुकारणे हेच त्यांचे आयुष्य! दोघींच्या या वागण्याला त्यांचा बाप, अर्थात बापू (विजय राज) पुरता वैतागला आहे. याच गावात राहणारा डीप्पर (सुनील ग्रोव्हर) हादेखील एक भन्नाट माणूस आहे. या दोघींमध्ये भांडण लावण्याचं एकही निमित्त हा सोडत नाही. या दोघींच्या भांडणाला गावातही फूल 'टीआरपी' असल्याने तो सातत्याने त्यांना भांडण्यासाठी प्रवृत्त करीत आहे. बापूचे आपल्या दोन्ही मुलींवर खूप प्रेम आहे. न भांडता त्यांनी राहावे, अशी त्याची भाबडी अपेक्षा आहे. गावातील श्रीमंत व्यक्ती असलेल्या पटेलचा (सानंद वर्मा) या दोन्ही मुलींवर डोळा आहे. बापूला काही कारणांमुळे पैशांची गरज आहे. दोन्हीपैकी एका मुलीशी लग्न लावून दिल्यास बापूला आवश्यक असलेले पैसे देण्याची पटेलची तयारी आहे. दोन्ही मुलींना मात्र हा 'सौदा' मान्य नाही. अखेर हे लग्न ठरते; पण लग्नापूर्वीच बडकी पळून जाते. बडकी पळून गेल्यावर छुटकीशी लग्न करण्यासही पटेल तयार होतो. मात्र, तीदेखील बडकीप्रमाणेच 'बॉयफ्रेंड'सोबत पळ काढते. माहेर सोडून दोघी नांदण्यासाठी एकाच घरात जातात आणि या गोंधळात आणखी भर पडते. पुढे काय होते? दोघींचे युद्ध कोणत्या थराला जाते? दोघींचे नवरे त्यांना सांभाळून घेतात का? डोक्यावर कर्ज झालेल्या बापूचे पुढे काय होते? या प्रश्नांची उत्तरे पाहण्यासाठी भारद्वाजचे हे 'भगिनीपुराण' पाहायला हवे.

एखाद्या गोष्टीपासून कितीही दूर पळले तरीही नशिबात असेल तर त्याच गोष्टीशी दोन हात करण्याशिवाय आपल्याकडे कोणताच पर्याय नसतो, हे साधे सूत्र लेखक-दिग्दर्शक पडद्यावर मांडतो. कथेतील काही 'ट्विस्ट' अपेक्षित असल्यामुळे चित्रपट पाहत असताना त्यात कोणतेही नावीन्य राहत नाही. कथेतील गुंता आणि त्यातील काही नमुनेदार गमती-जमती प्रभावीपणे पडद्यावर आणण्यात मात्र पटकथाकार विशाल भारद्वाज कमी पडतो. त्याचा परिणाम सिनेमावर होतोच. मध्यंतरानंतर ही बहिणींची गोष्ट काहीशी गडबडते. राजस्थानच्या लोककथांमधील काही अतर्क्य गोष्टींची (फँटसीची) जोड देऊन ही घसरणारी गाडी पुन्हा रुळावर आणली जाते. संपूर्ण कथानक गावातच घडते. त्यामुळे त्याची भाषा गावरान आहे. दोन बहिणींकडून सातत्याने एकमेकींचा होणारा 'उद्धार' रंगला आहे. या भांडणातून निर्माण होणाऱ्या गमतीजमती हाच या चित्रपटाचा आत्मा आहे. काही प्रसंगात हे 'युद्ध' अप्रतिमपणे साकारले जाते; पण एका ठराविक कालावधीनंतर त्यात तोचतोपणा येतो. सिनेमाचा आशय विनोदी असूनही तो विनोद तितकासा जोरकसपणे पडद्यावर येत नाही. कोणताही आव न आणता काही छोटे-मोठे 'पंच' येत राहतात आणि त्यातच प्रेक्षकाला सिनेमा शोधावा लागतो. अर्थात अशी शोधक वृत्ती भारद्वाजचा सिनेमा पाहताना ठेवावीच लागते, हे त्याचे पूर्वीचे चित्रपट पाहणाऱ्याला वेगळे सांगायची गरज नाही. भारद्वाजचा सिनेमा जमला तर एकदम फक्कड असतो; पण फसला तर तो डोक्याला त्रास ठरतो. इथे तो 'फक्कड' नाही; पण जमला आहे, हे जाणवते. या दोन्ही बहिणींच्या आयुष्यात भांडण असेल तरच त्या खऱ्या अर्थाने जिवंत आहेत, हे अधोरेखित करण्यासाठी केलेली प्रसंगांची मांडणी जमली आहे. सातत्याने एकमेकींना पाण्यात पाहणाऱ्या या दोघींच्या नात्यातील तरलताही दिग्दर्शकाने उत्तम रीतीने साकारली आहे. सान्या आणि राधिका दोघींची कामे उत्तमच. मात्र, लक्षात राहतात ते विजय राज आणि सुनील ग्रोव्हर. या दोघांनी या कथेत खऱ्या अर्थाने जीव भरला आहे. गुलजारांची गाणीही ग्रामीण बाज पकडणारी. चित्रपटाचं टायटल साँग आणि रेखा भारद्वाज यांनी गायलेलं 'बलमा' लक्षात राहतं. आणखी एक उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे विशाल भारद्वाज यानेच दिलेले चित्रपटाचे पार्श्वसंगीत. आशयाचा 'टोन' ते पकडतं आणि संपूर्ण चित्रपटभर त्यातील एक व्यक्तिरेखाच म्हणून आपल्यापुढं येतं. काही त्रुटी असल्या तरीही भारद्वाज यांचं हे 'दे मार' भगिनीपुराण एकदा अनुभवायला हवं. वेगळं काही पाहू इच्छिणाऱ्यांनी तो चुकवू नये.

ZANDU
EXPERT IN LIFESTYLE DISORDERS
Vigorex
Ayurvedic Capsule
Daily Energizer
contains 7 Powerful Ayurvedic Ingredients known to help in:
Stress reduction
Stamina & Energy
NATURAL & SAFE • SCIENTIFICALLY PROVEN
100% वेज कॅप्सूल
संबंधामध्ये जोश येण्यासाठी केवळ शिलाजित पुरेसे नाही
उपयोगात आणा 7 आयुर्वेदिक तत्वांची शक्ती
झडू विगोरेक्समध्ये आहे शिलाजीत,अश्वगंधा, सफेद मुसळी सारख्या 7 आयुर्वेदिक तत्वांची डबल ॲक्शन, जी:
- तणाव कमी करून, मूड बनवते
- ऊर्जा, क्षमता आणि जोश वाढवते

www.zanduayurveda.com
Helpline: 1-860-108-1001 (9:30am - 6:30pm)

बजाज फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: आकुर्डी, पुणे - 411 035
कॉर्पोरेट कार्यालय: 4 था मजला, बजाज फिन्सर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, ऑफ पुणे-अहमदनगर रोड, विमान नगर, पुणे - 411 014
मुदत ठेव योजना
'FAAA/Stable' मनांकन (रेटिंग) CRISIL द्वारे | 'MAAA (Stable)' मानांकन (रेटिंग) ICRA द्वारे
वरील मानांकन, इन्स्ट्रुमेंटवरील व्याज आणि मूळ रक्कमेची वेळेवर परतफेड या दृष्टिने उच्च श्रेणीची सुरक्षितता दर्शवते.

व्याजदर वार्षिक रु 5 कोटींपर्यंत वैध आहे. (01 ऑक्टोबर 2018 पासून लागू) (% वार्षिक.)

अवधी महिन्यांमध्ये	किमान ठेव (रुपयांमध्ये)	संचयी	गैर-संचयी			
			मासिक	त्रैमासिक	अर्ध वार्षिक	वार्षिक
12 - 23	25,000	8.00%	7.72%	7.77%	7.85%	8.00%
24 - 35		8.15%	7.88%	7.93%	8.00%	8.15%
36 - 60		8.50%	8.19%	8.24%	8.33%	8.50%
विशेष अवधी योजना						
15	1,00,000	8.05%	7.77%	7.82%	7.89%	8.05%

क) किमान ठेव वरील नमूद केल्या प्रमाणे.
ख) ज्येष्ठ नागरिक (60 वर्षापेक्षा अधिक वयाचे, वयाच्या पुराव्याच्या तरतुदिनुसार) – अतिरिक्त दर 0.35% वार्षिक, रु 5 कोटींपर्यंतच्या ठेवीसाठी.
ग) बजाज ग्रुप कर्मचारी- रु. 5 कोटींपर्यंत डिपॉझिटसाठी अतिरिक्त दरसाल 0.25% दर (बजाज होल्डिंग्ज अँड इनवेस्टमेंट लि., बजाज ऑटो लि., बजाज फिनसर्व लि., बजाज फायनान्स लि., महाराष्ट्र स्कूटर्स लि., बजाज अलियांझ जनरल इंशुरन्स कं. लि., बजाज अलियांझ लाइफ इंशुरन्स कं. लि., बजाज हाउसिंग फायनान्स लि., बजाज फिनसर्व डायरेक्ट लि., मुकंद लि. आणि बजाज इलेक्ट्रिकल्स लि. चे कर्मचारी)
घ) बजाज फायनान्स लिमिटेड वर्तमान कर्जधारक ग्राहक - अतिरिक्त दर 0.25% वार्षिक, रु. 5 कोटींपर्यंतच्या ठेवीसाठी
ङ) बजाज फायनान्स लिमिटेड वर्तमान मुदत ठेव ग्राहक - अतिरिक्त दर 0.25% वार्षिक, रु 5 कोटींपर्यंतच्या ठेवीसाठी (0.25% चा लाभ घेण्यासाठी गुंतवणूकदारांनी पहिल्या आणि दुसऱ्या ठेवीत 2 महिन्यांचे अंतर ठेवायला हवे.
च) प्रती व्यवहार वरीलपैकी पक्त एकाच विशेष श्रेणीचा लाभ घेता येईल.
छ) मुदत ठेव नूतणीकरण ग्राहक – (फक्त व्यक्ती) - अतिरिक्त दर 0.25% वार्षिक, रु 5 कोटींपर्यंतच्या ठेवीसाठी. अतिरिक्त दर विशेष श्रेणी लाभाच्या व्यतिरिक्त लागू.
ज) रु. 5 कोटींपेक्षा अधिक जास्तच्या एक रकमी ठेवीसाठी व्याजदर प्रकाशित कार्ड दरापेक्षा वेगळा असू शकतो व तो बजाज फायनान्स लिमिटेड द्वारे प्रत्येक प्रकरणानुसार ठरवला जाईल.

दि. 19 जुलै 2018 रोजी संचालक मंडळाच्या बैठकतील दिलेल्या मान्यतेनुसार कंपनीच्या मुदत ठेव योजनेच्या सर्व अटि व शर्ती त्याच आहेत.

दिनांक: 24 सप्टेंबर 2018
स्थळ: पुणे

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
राजीव जैन
व्यवस्थापकीय संचालक

गुंतवणुक कशी करावी:
रक्कम फक्त धनादेशाद्वारे जमा करावी व धनादेश बजाज फायनान्स लिमिटेड – खाते क्रमांक – 00070350006738 ला देय असवा आणि क्रॉस करुन अकाऊंट पेयी ओन्ली' असावा. हे धनादेश सममूल्य व CTS अनुरुप असावे. आवश्यक त्या रकमांसह अर्ज आणि बीएफएलच्या मुदत ठेव योजना वितरकांना पाठवावे किंवा कोणत्याही बीएफएल शाखेमध्ये सादर करावे.
ईमेल: fd@bajajfinserv.in | **मिस कॉल:** +91 92100 35555 | **फोन:** 020-71124281

8.75%* पर्यंत व्याज दर सध्याच्या फिक्स्ड डिपॉझिट** किंवा कर्जाच्या ग्राहकांसाठी
8.85%* पर्यंत व्याज दर ज्येष्ठ नागरिकांसाठी

*व्याज दर दरसाल आहे, 36-60 महिन्यांच्या संचयी स्कीम मुदतीवर संबंधित ग्राहक वर्गवारीसाठी लागू. नियम आणि अटी लागू.
**पहिल्या आणि दुसऱ्या ठेवी दरम्यान दोन महिन्यांचं अंतर असेल.

WORLD HEART DAY

महाराष्ट्र टाइम्स CONSUMER CONNECT INITIATIVE

हृदयरोगांना दूर ठेवा

नोकरदारांनी नोकरीशिवाय कुटुंबासोबत वेळ घालवणं, मुलांशी खेळणं, सहलींना जाणं, शास्त्रीय संगीत ऐकणं, पर्यटन, फोटोग्राफीसारखे छंद बाळगणं, लग्न समारंभासारख्या विविध कार्यक्रमांसह उपक्रमात सहभागी होणं अशा रितीने समाजात अधिक वावरायला पाहिजे. त्यामुळे हृदयरोगांपासून दूर राहता येईल.

आयटी-बीपीओसारख्या कंपन्यांसह सर्रास अनेक ठिकाणच्या नोकरदारांमध्ये ताणतणावामुळे (स्ट्रेस) हार्ट अॅटॅक येण्याचं प्रमाण वाढल्याने चिंता व्यक्त होऊ लागली आहे. टूरिझम, फोटोग्राफी, शास्त्रीय संगीतसारखे छंद जोपासून थोडं सोशल झाल्यास ताण कमी करता येऊ शकेल, असा सल्ला हृदयरोगतज्ज्ञ देतात.

अनेक प्रकारच्या नोकऱ्यांच्या ठिकाणी नोकरदारांना त्यांच्या कामाचं टार्गेट पूर्ण करावं लागतं. टार्गेट पूर्ण करण्याच्या प्रयत्नात ताणतणाव अधिक वाढल्याने आरोग्याकडे दुर्लक्ष होऊन हार्ट अॅटॅक येण्याचं प्रमाण वाढत आहे, ही चिंतेची बाब आहे. ताणतणाव दूर करण्यासाठी नोकरदारवर्ग धूम्रपान, मद्यपानाकडे वळतो. यामुळे आयटी, बीपीओसारख्या नोकरदारांमध्ये हार्ट अॅटॅक येण्याचं प्रमाण जास्त आहे. नोकरदारांनी नोकरीशिवाय कुटुंबासोबत वेळ घालवणं, मुलांशी खेळणं, सहलींना जाणं, शास्त्रीय संगीत ऐकणं, पर्यटन, फोटोग्राफीसारखे छंद बाळगणं, लग्न समारंभासारख्या विविध कार्यक्रमांसह उपक्रमात सहभागी होणं अशा रितीने समाजात अधिक वावरायला पाहिजे. त्यामुळे हृदयरोगांपासून दूर राहता येईल.

आयटी, बीपीओ नोकरदारांपैकी २० ते २५ टक्के तरुणांना हार्ट अॅटॅक येतो. सध्या ३० ते ४५ वयातल्या नोकरदारांमध्ये हार्ट अॅटॅक येण्याचं प्रमाण वाढत आहे. त्यामुळे ३० ते ३५ वयात अँजिओप्लास्टी केल्याची घटना सर्रास कानावर येतात. सात तास झोपणं, सकाळी नाश्ता करणं यामुळेदेखील नोकरदारांमध्ये हार्ट अॅटॅक येण्याचं प्रमाण कमी होऊ शकतं.

> प्रिव्हेण्टिव्ह कार्डिओलॉजीच्या मदतीने हृदयरोगांची लक्षणं वेळीच ओळखता येतात आणि त्यामुळे आपल्या हृदयाचं संरक्षण करता येतं. त्याचबरोबर रुग्णाला योग्य मार्गदर्शन देऊन अँजिओप्लास्टी, बायपाससारख्या हृदयाच्या शस्त्रक्रिया टाळता येऊ शकतात. जगभरात हृदयरोगांमुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यामुळे आपल्या हृदयाचं आरोग्य टिकवणं, हे आपल्याच हातात आहे.
>
> **डॉ. ज्योत्स्ना पाटील,**
> संचालिका, पूना प्रिव्हेण्टिव्ह कार्डिओलॉजी सेण्टर, पुणे

> हृदयरोग असणारे अनेक रुग्ण आयुर्वेदिक उपचारांकडे वळत आहेत. आयुर्वेदातल्या प्रतिबंधात्मक उपचारांचा प्रत्यय अनेकांना आल्याने या उपचारांकडे वळणाऱ्यांची संख्या वाढली आहे. आयुर्वेद ही एक जीवनशैली आहे जी निरोगी हृदयासाठी अतिशय महत्वाची आहे.
>
> **डॉ. अर्चना धुमाळ,**
> आयुर्वेद प्रॅक्टिशनर

निरोगी हृदयासाठी काय कराल?

- नोकरी, घर अथवा मित्रमंडळींमध्ये कोणतीही गोष्ट गांभीर्याने न घेता खेळीमेळीने घ्यावी.
- नोकरीच्या ठिकाणचं वातावरण आनंदी, खेळकर ठेवा.
- त्रासदायक गोष्टींबाबत चिडचिड न करता मन खंबीर ठेवा.
- योगासनं केल्यास मन :शांती मिळेल.
- रोज सकाळी अर्धा तास चालल्यास मन प्रसन्न ठेवता येईल.

बचाव हार्ट अॅटॅकपासून

हार्ट अॅटॅकमुळे अकाली मृत्यू होण्याचं प्रमाण सर्वाधिक आहे. हार्ट अॅटॅक आल्याने अनेक गंभीर विकार उद्भवतात. त्यामध्ये, हृदयाचे अनेक विकार उद्भवणं, हृदय निकामी होणं, पक्षाघात, मूत्रपिंड निकामी होणं यासारखे धोके उद्भवतात. त्याला आळा घालण्यासाठी वेळीच उच्चरक्तदाब, धमणी काठिण्य, उच्च कोलेस्टेरॉल, मधुमेह आणि स्थूलता या विकारांवर योग्य उपचार करणं आवश्यक आहे. मानसिक ताणतणावांना दूर ठेवावं.

> 'जागतिक योग दिना'मुळे सर्वत्र योगविषयक जागृती निर्माण झाली आहे. साध्या आणि सोप्या आसनांच्या माध्यमातून हृदरोगांना नियंत्रणात ठेवता येऊ शकतं. योगसाधनेच्या जोडीला आहारातही बदल केले जातात. श्वसनाचे प्रकार आणि प्राणायाम यामुळे खूप मोठे, सकारात्मक बदल घडून येऊ शकतात. योगसाधनेमुळे केवळ ताणतणावच कमी होत नाहीत तर योगच्या मदतीने आपण एक निरोगी आयुष्यही जगू शकतो. केवळ हृदरोग बरे करण्यासाठीच लोक योगसाधनेकडे वळत नाही आहेत तर एकंदरीतच निरोगी आयुष्य जगण्याचा एक हमखास मार्ग म्हणून त्याकडे पाहत आहेत.
>
> **श्रीकांत क्षीरसागर,**
> योगतज्ज्ञ

पुढील व्यक्तींना हार्ट अॅटॅक येण्याची शक्यता असते:

- वयाची पंचविशी ओलांडलेल्या व्यक्ती
- स्थूलता, मधुमेह, धमण्या ताठर बनणं, उच्च रक्तदाब, मानसिक तणाव या विकारांनी पीडित व्यक्ती
- धूम्रपान, मद्यपान, तंबाखू, अमली पदार्थ आदींचे व्यसन असणाऱ्या व्यक्ती

हृदयविकारावर वेळीच उपचार झाल्यास रुग्णाचा जीव वाचवता येतो. वैद्यकीय मदत मिळेपर्यंत रुग्णाला आडवं झोपवावं. त्याचे घट्ट कपडे सैल करावे. ऑक्सिजन सिलेंडर उपलब्ध असल्यास रुग्णाला त्वरित ऑक्सिजन द्यावा. नायट्रोग्लिसरीन किंवा सॉर्बिट्रेटच्या गोळ्या उपलब्ध असल्यास त्यातली एक गोळी जिभेखाली द्यावी. अॅस्परिन पाण्यात विरघळवून द्यावी.

हृदयविकारापासून ज्यांना धोका आहे किंवा वाचायचं आहे त्यांनी खालील नियम पाळावेत :

- आहार पोषक ठेवा.
- मेदयुक्त आहार टाळावा तसंच जेवणात मीठ कमी असावं.
- फायबर आणि कार्बोहायड्रेट उच्च मात्रेत असावे.
- वजन जास्त असणाऱ्यांनी ते कमी करावं. दररोज व्यायाम करण्याचीदेखील गरज आहे.
- धूम्रपान करू नये व करत असल्यास त्वरित बंद करावं.
- मधुमेह, रक्तदाब किंवा जास्त कोलेस्टेरॉल असणाऱ्यांनी त्यांची रोजची औषधं नियमित चालू ठेवावी.

– टीम मटा
mtartnedit@timesgroup.com

साधु वासवानी मिशन्स मेडिकल कॉम्प्लेक्स
फाबयानी अॅण्ड बुधराणी हार्ट इन्स्टिट्यूट

आम्ही घेतो काळजी,
चिमुकल्या हृदयाची !

बाल हृदयविकार आणि जन्मजात हृदयरोगांवर उपचार केंद्र

- पूर्ण वेळ बाल हृदयविकार तज्ञ/ हृदयरोग सर्जन.
- नवजात शिशू, अर्भक, लहान मुले आणि प्रौढ व्यक्तींसाठी हृदयावरिल परिपूर्ण औषधोपचार व शस्त्रक्रिया.
- वाजवी दरात हृदय उपचार.
- ओपीडी सेवा – परिपूर्ण तपासणी, २ डी इको, ३ डी इको, टीईई, इसीजी, हॉल्टर मॉनिटरिंग, ट्रेडमिल टेस्टिंग, ६४ स्लाइस सीटी स्कॅन.
- सर्वोत्कृष्ट – इंट्रा ऑपरेटिव्ह पेडियाट्रिक टीईई, हृदय शस्त्रक्रियांसाठी समर्पित ऑपरेशन थिएटर्स, पीआयसीयू, एनआयसीयू.
- पेडियाट्रिक कार्डियाक ॲनेस्थेशिया/परफ्युजनचे व्यवस्थापन करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री.
- कॅथ लॅब.

खास ऑफर २ डी इकोसह सल्ला व मार्गदर्शन सोमवार ते शनिवार – स. १० ते दु. ४ **रू.१४००/-**

७-९, कोरेगांव पार्क, पुणे – ४११ ००१.
फोन: ६६०९ ९९७७/६६०९ ९९९९ Extn.: ६१८/६१९
ईमेल: fbheartinstitute@gmail.com
© Patient Relations - 8007110055

जागतिक **हृदय दिनी,** हृदयाची काळजी घेऊ सर्वांनी !

कार्डिओलॉजीस्टसह तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश
आता अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी टाळा.
जगभरात सुविख्यात
ईईसीपी, किलेशन, सोबतच जर्मन ईएसएमआर थेरपी
पुणे व चिंचवडमध्ये प्रथमच

डॉ. ज्योत्स्ना पाटील

- अँजिओप्लास्टी व बायपास टाळण्यासाठी उपयोगी.
- शस्त्रक्रियेपश्चातही ज्यांना छातीमध्ये वेदना (अंजायना) आहेत किंवा दम लागतो अशा रुग्णांसाठी प्रभावी.
- वैद्यकिय किंवा इतर कारणांमुळे ज्यांची शस्त्रक्रिया करणे शक्य नाही अशा रुग्णांसाठी.
- ज्यांच्या हृदययाची पंपिंग क्षमता (EF) कमी आहे.

हॉस्पीटलायझेशनची गरज नाही | शस्त्रक्रिया नाही | भूल नाही

पूना प्रिव्हेन्टिव्ह कार्डिओलॉजी सेंटर
स्वारगेट : तावरे बेकरीसमोर, सुपर्ण हॉलशेजारी, अरण्येश्वर चौक, पुणे.
चिंचवड : जुना पॉवर हाउस चौक, मोरया हॉस्पिटलमागे, चिंचवडगांव, चिंचवड, पुणे.
संपर्क: 9623925066, 9637066166 | www.punechelation.com

NOBLE HOSPITAL
Life is Precious, We Care for it...
Mark of Excellence
NABH
२९ सप्टेंबर २०१८
जागतिक हृदयदिनानिमित्त
नोबल रुग्णालय तर्फे
सवलतीच्या दरात हृदय तपासणी
२८ सप्टेंबर २०१८ ते १० ऑक्टोबर २०१८
सोमवार ते शनिवार | स. ९ ते दु. ३.

हेल्थी हार्ट पॅकेज:
- रँडम ब्लड शुगर
- हिमोग्राम
- लिपिड प्रोफाइल
- सिरम क्रीएटीनीन
- इ सी जी
- २डी एको
- टी एम टी
- हृदयरोग तज्ञांचा सल्ला

फक्त १,५००/- रुपयात

संपर्क : ०२० ६६२८ ५०००
१५३, मगरपट्टा सिटी रोड, हडपसर, पुणे ४११ ०१३
www.noblehospitalspune.com
care@noblehospitalspune.com